# भाषेचे माध्यम आणि विवेक

दत्ता भगत

परिवर्तनाचा वाटसरू (१६ ते ३१ मे २०१७) मधील किशोर दरक यांचा लेख वाचला. 'लोकसत्ते'त आलेली 'बनाव' बातमी अथवा लोकसत्तेचा अग्रलेख मी मुळात वाचलेला नाही. बहुधा अग्रलेखात 'भाषिक दर्जा घसरू लागला आहे, कारण आपल्या जगण्यातील वैचारिक दर्जा घसरू लागला आहे' हा सूर त्या अग्रलेखात असावा आणि तोच सूर दरक यांना खटकला. म्हणून त्यांनी एवढी विस्तृत प्रतिक्रिया नोंदवली असावी असे वाटते. 'जगणे विस्तारत जाते तसतशी भाषा विस्तारत असते.' ही खरे तर भाषिक बदलाची प्रक्रिया असते. 'लोकसत्ते'चे संपादक कुणी भाषा अभ्यासक नाहीत. त्यामुळे त्यांची 'भाषाभ्यासा'संबंधीची मते फारशा गांभीर्याने घेण्याची आवश्यकता आहे असे मला वाटत नाही. दरक यांनी व्यक्त केलेल्या प्रतिक्रियेत दोन मुद्दे आले आहेत म्हणून हे पत्र.

मी भाषा आणि वाङ्मयाचा विद्यार्थी आहे. सुमारे तीस वर्षे प्रत्येक शैक्षणिक वर्षाचा पहिला तास बी.ए. प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांना मी याच विषयावर व्याख्यान देत असे. कुठलीही भाषा शुद्ध नसते तशीच ती अशुद्धही नसते. भाषा आणि वाङ्मय या दोन्ही क्षेत्रांतही मानदंड असणारे ज्ञानेश्वर अनेक ठिकाणी 'म्या' शब्द वापरतात. तर 'व्हतो' या शब्दाला हसणारे पुणेकर 'न-व्हतो' हा शब्द वापरताना प्रतिष्ठेने मिरवतात. 'ष' आणि 'श'मधला उच्चारभेद अनेक पुणेकरांना कळत नाही तर 'न' आणि 'ण'मधला उच्चारभेद आम्हा मराठवाड्यातल्या अनेकांच्या लक्षात येत नाही. पुण्यात भाषणासाठी गुरुवर्य कुरुंदकर उभे राहिले म्हणजे 'काल आपण कुठ्ठोर आलो होतो, हा तर बाबरापासून अकबरापस्तोरचा कालखंडः' अशी सुरुवात करीत ते त्यांना कुठवर हा शब्द उच्चारता येत म्हणून किंवा 'पर्यंत' हा शब्द माहीतच नव्हता म्हणून नव्हे, तर असो.

दरक यांची प्रतिक्रिया वाचताना मला अलबेरुनीची निरीक्षणं आठवली. अलबेरुनी हा मूळचा तुझबेकिस्तानचा. तो इतिहासाचा अभ्यासक होता. त्याला अनेक भाषा येत असत. महंमद गझनीने भारतात स्वारीसाठी येताना त्याला आपल्या सोबत गुलाम म्हणून आणले. तो पुढे भारतभर हिंडला. हजार वर्षांपूर्वीचे भारताचे लोकजीवन, भारतातले तत्त्वज्ञान आणि भारताचा भूगोल, या विषयावरचे त्याचे लेखन एक इतिहास सामग्री म्हणून अत्यंत मौलिक स्वरूपाची सामग्री आहे असे संशोधक मानतात. त्याची दोन निरीक्षणं अत्यंत महत्त्वाची आहेत. तो म्हणतो, 'आपल्या भाषेतील वैशिष्ट्यांचा हिंदुस्थानातील

लेखक नवी मुंबईस्थित ज्येष्ठ नाटककार आहेत.
ईमेल dattabhagat@gmail.com

प्रकाशन दिनांक १६-११-२०१७

लोकांना मोठा अभिमान आहे. वस्तुत: हा त्यांच्या भाषेतील एक दोष आहे असे मला वाटते.' हे निरीक्षण नोंदवताना त्याच्या डोळ्यासमोर आधी अभिजन आहेत. कारण तो येथील लोकांविषयी लिहितो :

''अहंकाराची भावना हिंदूंमध्ये खोलवर रुजली आहे. जगाच्या पाठीवर आपल्या देशासारखा दुसरा देशच नाही, आपल्या राजासारखे राजे कोठे नाहीत, आपला धर्म हाच एकमेव धर्म, आपल्या शास्त्रासारखी शास्त्रेही इतरत्र नाहीत, असा त्यांचा समज आहे. ते आपल्या ज्ञानाचा इतरांना लाभ घेऊ देत नाहीत. या बाबतीत ते कृपण आहेत. आपल्या धर्मातील इतर जातीच्या लोकांनाही हे ज्ञान मिळू नये, याबद्दलही ते विशेष दक्षता घेतात.'' वेदाच्या कृपणतेविषयी ज्ञानेश्वरांचं भाष्य प्रकट होण्याआधीचे हे अलबेरुनीचे निरीक्षण आहे हे लक्षात घ्यायला हवे. आपणास शुद्ध भाषेची आवश्यकताच नाही. पण 'प्रमाण'भाषा मात्र आपली गरज आहे. ती अव्हेरता येणार नाही, हेही तेवढेच खरे. 'शुद्ध-अशुद्ध' शब्द मूल्यवाचक आहेत. म्हणून ते कुणीतरी, कुणाला तरी हिणवण्यासाठी येतात. त्याऐवजी 'प्रमाण' व 'बोली' हे शब्द मात्र भाषिक स्वरूपातील भेद दाखवणारे आहेत. ते कुणालाही नाकारता येत नाहीत. एवढा भाषा विवेक वापरणाराला समजून घेता आला पाहिजे, ही दरक यांची अपेक्षा रास्त आहे. ●

**संदर्भ** :
अलबेरुनीचा भारत - खंड १, पृष्ठ ५, साहित्य अकादमी प्रकाशन, १९८६.

**(रमेश आगाशे ... पान ६१ वरून)**

मराठवाड्याचा पाणी प्रश्न, जायकवाडी प्रकल्प आणि शिरपूर प्रयोगाचा गाजावाजा ह्याबद्दलही स्वतंत्र प्रकरणे आहेत.

लेखकाची बरीच मते वास्तवावर आधारलेली असल्याने समर्थनीय आहेत. अभिव्यक्ती नीट, धीट आणि स्पष्ट आहे. भाषाशैली समृद्ध आणि बोलकी असल्याने लेखकाची कठोर भूमिका आपण समजू शकतो. पण लेखकाने चौकशी समितीच्या अध्यक्षांबद्दल आदर व्यक्त करतानाच काही व्यक्तिगत विधाने केली आहेत. ती टाळता आली असती असे वाटते.

एकूण हे पुस्तक लिहून पुरंदरे यांनी सिंचन व्यवस्थापनातील अक्षम्य, अनागोंदीचा, दिरंगाईचा, कायद्याचे सहज उल्लंघन करण्याचा, भ्रष्टाचाराला वाव देण्याचा आणि राजकीय दबावांचा पर्दाफाश केलेला आहे. एक तऱ्हेचे हे वस्त्रहरण आहे. अशा तऱ्हेचा कडू डोस देऊन सिंचन व्यवस्थेचे आरोग्य दुरुस्त करण्याची खूप गरज होती. ते कडू काम धीटपणे केल्याबद्दल लेखकाचे मनापासून अभिनंदन. शासन ह्याची योग्य दखल घेईल अशी आशा करूया.

ज्यांना सिंचन व्यवस्थापन गंभीरपणे समजून घ्यायचे आहे व सिंचनाशी संबंधित मंत्र्यांपासून कनिष्ठ अधिकाऱ्यांसाठी हे 'मस्ट-रीड' आहे.

●

**पाण्याशप्पथ** (२०१७) प्रदीप पुरंदरे, लोकवाङ्मय गृह, मुंबई, पृ. २६४ मूल्य २०० रु.

**चुकीची दुरुस्ती :**
१ ते १५ नोव्हेंबरच्या अंकात मिलिंद इनामदार यांचा 'नोटाबंदी साम्राज्यवादाचा फास' हा लेख प्रसिद्ध झाला होता. त्यात एक वाक्य असे होते. '३० मार्च रोजी सर्व बँका उघडल्या गेल्या व नोटा बदलण्यासाठी एकच झुंबड उडाली.' त्यात ३० मार्चच्या ऐवजी १० नोव्हेंबर असे वाचावे. दिलगीर आहोत. - **संपादक**